मूल्य चार रुपये

Reg. No. RNP/NP CITY/236/2012-14
Without Prepayment of Postage
No. RNP/NP CITY/WPP/28/2012-14.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

नं. १५ ] गुरुवार, दिनांक ३ मे २०१२/वैशाख १३, शके १९३४

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

(भाग ४-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (ना.वि.पु.) म.शा.रा., अ.क्र. ९१

### URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai-400 032, Dated the 13th April, 2012.

*CORRIGENDUM*

No. TPB-4307-CR-334-2007-UD-11.—

In Government of Urban Development Department's Notification of even number dated 18th January 2012, published in the Maharashtra Government Gazette, Part I-A, Nagpur Divisional Supplement dated 5th April 2012, on page Nos. 473 to 476 at Sr. No. 71, the following Para in the Schedule-A, after Sr. No. 5 shall be inserted as follows :—

"The above regulations shall be applicable after it is finally sanctioned by the Government under Section 37(*IAA*) (*C*) of the said Act."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJENDRA HABDE,
Under Secretary.

भाग १-अ (ना.वि.पु.) म.शा.रा., अ.क्र. ९२

### URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai-400 032, Dated the 13th April, 2012.

*CORRIGENDUM*

No. TPB-4307-CR-334-2007-UD-11.—

In Government of Urban Development Department's Notification of even number dated 18th January 2012, published in the Maharashtra Government Gazette, Part I-A, Nagpur Divisional Supplement dated 5th April 2012, on page Nos. 476 to 482 at Sr. No. 72, the following Para in the Schedule-A, after Sr. No. 5 shall be inserted as follows :—

"The above regulations shall be applicable after it is finally sanctioned by the Government under Section 37(*IAA*) (*C*) of the said Act."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJENDRA HABDE,
Under Secretary.

भाग १-अ (ना.वि.पु.) म.शा.रा., अ.क्र. ९३

## अतिरिक्त उपायुक्त II , यांजकडून

क्रमांक-४८३-वावि-२०१२.—

ज्याअर्थी, सार्वजनिक ठिकाणी वातावरणात दिवसेंदिवस ध्वनिची तीव्रता विविध स्त्रोतांमुळे वाढतच आहे. तसेच औद्योगिक कामे, विविध प्रकारची बांधकामे, जनित्रे (जनरेटर्स), ध्वनिवर्धक (लाऊड स्पीकर्स), सार्वजनिक सभा, संगीत वाद्ये, वाहनांचे भोंगे व इतर यांत्रिक साधनांमुळे वातावरणातील ध्वनीचे प्रमाण वाढतच आहे. वाढत्या ध्वनी प्रदुषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर व मानसिक स्वास्थ्यावर अनिष्ट परिणाम होत असल्यामुळे वातावरणातील ध्वनीची योग्य पातळी राखण्याच्या हेतुने ध्वनी उत्पन्न करणाऱ्या व निर्माण करणाऱ्या स्त्रोतांचे नियमन व नियंत्रण करणे आवश्यक आहे असे वाटते ;

आणि ज्याअर्थी, ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० चे नियम २ (क) आणि महाराष्ट्र शासनाचे पर्यावरण विभाग यांचे शासन निर्णय क्र. ध्वनिप्र-२०००-प्र.क्र. २४-ता.क्र. ३, दिनांक १५ जून, २००१ नुसार पोलीस उप आयुक्त यांची ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० ची अंमलबजावणी करणे कामी एक सदस्यीय प्राधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी शासन निर्णय क्र. संकीर्ण-२००९-अनौ.स.२२-प्र.क्र. ११६-नवि-२०, दिनांक १४ ऑक्टोबर २००९ नुसार आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांचे मान्यतेने अति. उप आयुक्त-II, सामान्य प्रशासन विभाग, महानगरपालिका, नागपूर यांना सक्षम प्राधिकरण म्हणून न्यायालये, शैक्षणिक संस्था व रुग्णालयांचा सभोवतालचा परिसर शांतता झोन म्हणून जाहीर करणेबाबत निर्देश दिले आहेत ;

आणि ज्याअर्थी, शांतता झोन जाहीर करणेपूर्वी नागरिकांकडून सूचना किंवा आक्षेप पत्र पाठविणेबाबत यापूर्वी लेखी जाहीर सूचना स्थानिक दैनिक वर्तमानपत्रात व वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे आणि ज्याअर्थी, सक्षम प्राधिकारी म्हणून जनतेकडून आलेल्या सूचना व हरकतींचा विचार करण्यात आला आहे ;

त्याअर्थी, आता, मी, संजय निपाणे, अति उप आयुक्त-II, सामान्य प्रशासन विभाग, महानगरपालिका, नागपूर वरील महाराष्ट्र शासनाचे नगर विकास विभाग, शासन निर्णय दिनांक १४ ऑक्टोबर, २००९ नुसार सोबत जोडलेल्या परिशिष्ट मध्ये निर्दीष्ट केलेली न्यायालये, शैक्षणिक संस्था व रुग्णालयांचे सभोवतालचा परिसर ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० ची पोलीस उप आयुक्त, नागपूर शहर यांचे अंमलबजावणी करीता शांतता झोन (Silence Zone) म्हणून या अधिसुचनेद्वारे जाहीर करीत आहे ;

त्याअर्थी, शांतता झोन अंतर्गत येणाऱ्या कोणत्याही ठिकाणी कोणी पुढील पैकी कोणताही अपराध करील तो या अधिनियमाच्या तरतुदीन्वये पोलीस उप आयुक्त, नागपूर शहर यांना असलेले अधिकारानुसार शिक्षा किंवा दंडास पात्र राहील.—

१. जो कोणी गाणे वाजविल किंवा कोणत्याही ध्वनियंत्रकाचा वापर करील.
२. जो कोणी ढोल किंवा टमटम वाजवेल किंवा एकतार संगीत किंवा ताणाचे यंत्र फुंकील किंवा तुतारी फुंकील किंवा कोणतेही वाद्य वाजवेल.
३. जो कोणी गर्दी खेचणाऱ्या एखाद्या स्वरुपाचा, कोणताही नकलांचा, संगीताचा किंवा इतर कार्यक्रमाचे प्रदर्शन करील.

नागपूर महानगरपालिका, नागपूर

शांतता झोनची सुची (झोननिहाय)

| झोन क्र. (१) | झोनचे नाव (२) | न्यायालय (३) | शैक्षणिक संस्था (४) | रुग्णालये (५) | एकूण (६) |
|---|---|---|---|---|---|
| १ | लक्ष्मीनगर झोन .. .. | निरंक | २३ | १९ | ४२ |
| २ | धरमपेठ झोन .. .. | १ | ३८ | २० | ५९ |
| ३ | हनुमान नगर झोन .. .. | — | ५० | ३० | ८० |
| ४ | धंतोली झोन .. .. | — | ३७ | २७ | ६४ |
| ५ | नेहरुनगर झोन .. .. | — | २९ | ६ | ३५ |
| ६ | गांधीबाग झोन .. .. | — | २८ | २ | ३० |
| ७ | सतरंजीपूरा झोन .. .. | — | ४४ | ४ | ४८ |
| ८ | लकडगंज झोन .. .. | — | ९० | ३३ | १२३ |
| ९ | आसीनगर झोन .. .. | — | २४ | १५ | ३९ |
| १० | मंगळवारी झोन .. .. | ३ | ३३ | १४ | ५० |
| | एकूण .. | ४ | ३९६ | १७० | ५७० |